# द्वैराष्ट्रवाद-भारत-पाकिस्तान

*अनिर्णित राहिलेल्या शिखर परिषदेमध्ये, तत्पूर्वी तसेच तदनंतर पाकिस्तान राष्ट्राध्यक्ष जनरल परवेझ मुश्रफ यानी मांडलेला मुख्य मुद्दा म्हणजे 'मुसलमान म्हणजे पाकिस्तान व पाकिस्तान म्हणजे मुसलमान, तसेच हिंदू म्हणजे हिंदुस्थान व हिंदुस्थान म्हणजे हिंदू'. परंतु हा द्वैराष्ट्र सिद्धान्त केंव्हाच मोडीत निघाला आहे हे अजूनही पाकिस्तानी (काहीभारतीय सुद्धा) धर्मगुरु, राज्यकर्ते आणि राजकारण करणाऱ्या व्यक्तीनी समजून घेतले नाही. बंगलादेश तसेच निरनिराळ्या धर्माचे भारतीय हेच दाखवतात की, धर्माधिष्ठित राष्ट्र हे आजच्या युगात अशक्य आहे व धर्मनिरपेक्ष राष्ट्र हे सत्य आहे. सर्व प्रगत राष्ट्रे धर्मनिरपेक्ष किंवा धार्मिक बाबतीत उदार आहेत. धर्म हा पाया मानून देशाच्या सीमा ठरवणे हे कितपत शहाणपणाचे ठरेल?*

*दुसरा महत्त्वाचा मुद्दा, स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारत अथवा पाकिस्तानमध्ये विलीनीकरणाचा निर्णय घेण्याचा हक्क संस्थानिकाना होता. प्रजेला नव्हे. प्रजेला हा हक्क द्यायचा झाला तर भारत तथा पाकिस्तान मधील निम्याहून जास्त प्रजेला हा हक्क द्यावा लागेल व सर्व दूर अराजक माजेल. काश्मीर किंवा अन्य कोठलाही भूभाग भारतात असावा किंवा पाकिस्तानात याचा निर्णय झालेला आहे. तो फिरवण्या प्रश्न येतोच कोठे? मुश्रफ साहेबानी हे समजून घेऊन भारताशी संवाद साधला तर तो फलदायी होईल. ईश्वर/अल्ला त्याना तसेच पाकिस्तानी व भारतीय धर्मगुरु, राज्यकर्ते आणि राजकारणी व्यक्तीना असा विचार देवो हीच प्रार्थना.*